भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ४/०८/२०१७

**१) बस न थांबविल्याचे कारणा वरून संगनमत करून काठीने पायावर, कमरेवर, पाठीवर मारून तसेच तलवारीने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०२/०८/२०१७ चे १२.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी संजय झडबाजी मेश्राम वय ४९ वर्ष रा. बेला हे खाजगी बसचे चालक असुन कंपनीचे कामगार याची ने आण करतात, घटनेपुर्वी फिर्यादीने बस थांबवीली नाही याचा राग मनात धरून यातील आरोपीने संगनमत करून फिर्यादीस काठीने पायावर, कमरेवर ,पाठीवर जखमी करून पुन्हा तलवारीने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणा वरून लाकडी काठीने डोक्यावर मारून इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०३/०८/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील आरोपीला फिर्यादीने ' तु मटनवाल्याला मटनचे पैसे का देत नाही ' मला मटनाचे पैसे मागतो, असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला ढकलुन दिले त्याच्या डोक्यावर लाकडी काठीने मारून जखमी केल्याने फिर्यादी राजु फत्तु टेकाम वय ४० वर्ष रा. गोबरावाही यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) लापरवाहीने वाहन चालवुन लुना गाडीला धडक मारून दोन जखमी . :—**

दिनांक ०३/०८/२०१७ चे ०१.३० वा. दर. यातील फिर्यादी चंदनगीर सावगीर गिरी वय ५६ वर्ष रा. आसगाव हा व त्याची पत्नी सौ. सुनंदा गिरी हीचे सह त्याचे लुना क्र. एमएच ३१/ ५५७९ वर डबल सिट बसवुन मोटार पंप चालु करण्यास शेतावर जात असतांनी, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे लुना गाडीला धडक मारून फिर्यादीस व फिर्यादीचे पत्नीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने जखमीचे बयान व एम.एल.सी. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४/१८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०३/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक ०१ , तीन सिटर वाहनांवरती १७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८५६५६२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.